दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष-२ ■ अंक-२९ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २० फेब्रुवारी २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना मजबूत




### पक्षाचे नाव आणि चिन्ह मिळाल्यानंतर रमाकांत मढवी यांची प्रतिक्रिया

**दिवा:–** तमाम शिवसैनिकांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास असून निवडणूक आयोगाच्या लढाईत अखेर सत्याचा आणि बहुमताचा विजय झाला आहे अशी प्रतिक्रिया शिवसेनेचे दिवा शहर प्रमुख माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांनी दिवा न्यूज सोबत बोलताना दिली.

निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयामुळे शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून दिव्यातील शिवसैनिकांनी या निर्णयानंतर जल्लोष केल्याचे रमाकांत मढवी म्हणाले. बहुमत एकनाथ शिंदे साहेबांच्या बाजूने असल्याने झालेला निर्णय हा कायद्यानुसारच आहे असेही ते यावेळी म्हणाले. दिव्यातील शिवसैनिक पहिल्या दिवसापासून शिंदे साहेब यांच्यासोबत असून येथील शिवसैनिक हे निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयामुळे आनंदी असल्याचे रमाकांत मढवी यांनी यावेळी सांगितले. निवडणूक आयोगाने निर्णय दिल्यानंतर शहरातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, शाखाप्रमुख यांनी एकत्र येत जल्लोष केला. पुढील निवडणुकात शिवसेना मजबूत असल्याचे आपल्याला पाहायला मिळेल असेही रमाकांत मढवी यांनी यावेळी बोलताना सांगितले. दरम्यान कसबा पोटनिवडणुकीत भाजप शिवसेना युतीचे उमेदवार विजयी होतील आणि त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्यकर्ते म्हणून आमची त्या ठिकाणी युतीच्या उमेदवाराचा प्रचार करण्यासाठी नियुक्ती झाली असल्याचेही रमाकांत मढवी यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

## दिवा शहरातील महिला व लहान मुलांसाठी स्वतंत्र रुग्णालय सुरू करा!

### भाजपच्या ज्योती राजकांत पाटील यांची पालिकेकडे मागणी



### दिवा पश्चिमेला असणाऱ्या पालिका उपविभागीय कार्यालयातील जागेचे सर्वेक्षण करून तिथे स्वतंत्र रुग्णालय उभारल्यास रुग्णालयाच्या जागेचा प्रश्न लवकर सुटेल, ज्योती पाटील यांची सूचना

**दिवा:–** दिवा शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता आणि दिवा शहरात वैद्यकीय सेवा सुविधांची असलेली उणीव लक्षात घेऊन दिवा पश्चिमेला महापालिकेच्या जागेमध्ये लहान मुलांसाठी व महिलांसाठी विशेष रुग्णालय ठाणे महानगरपालिकेने सुरू करावे अशी जाहीर मागणी भारतीय जनता पार्टीच्या महिला अध्यक्षा ज्योती राजकांत पाटील यांनी केली आहे.



दिवा शहरात महापालिकेमार्फत ठाणे शहराप्रमाणे वैद्यकीय सेवा सुविधा पुरवल्या जाव्यात अशी जाहीर मागणी भाजपच्या ज्योती पाटील यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे. ही मागणी करताना ज्योती पाटील यांनी दिवा शहरात नागरिकांसाठी स्वतंत्र रुग्णालय उभारण्यासोबतच महिला व लहान मुलांसाठी दिवा पश्चिमेला पालिकेची उपविभागीय कार्यालयाची जी जागा उपलब्ध आहे, या ठिकाणी जागेचे सर्वेक्षण करून लहान मुलं व महिलांसाठी स्वतंत्र रुग्णालय सुरू करावे अशी मागणी केली आहे. दिवा शहरातील गरोदर महिलांना उपचारासाठी डोंबिवली किंवा ठाणे येथील महापालिकांच्या रुग्णालयांमध्ये किंवा खाजगी रुग्णालयांमध्ये दाखल व्हावे लागते. दिवा शहरात महिलांसाठी स्वतंत्र रुग्णालय महापालिकेने सुरू केल्यास त्याचा फायदा येथील सर्वसामान्य महिलांना होईल व त्याचबरोबर लहान मुलांसाठी स्वतंत्र रुग्णालय सुरू केल्यास येतील अनेक पालकांना आपल्या लहान बाळाला उपचार मिळवून देण्यास सोपे जाईल असे ज्योती पाटील यांनी म्हटले आहे. दिव्यासाठी स्वतंत्र प्रभाग समिती कार्यालय खर्डी येथे सुरू झाल्यानंतर दिवा पश्चिमेला असणारे उपविभागीय कार्यालय या जागेचे सर्वेक्षण करून तेथील उपलब्ध जागेमध्ये तातडीने स्वतंत्र महिला व लहान मुलांसाठी रुग्णालय सुरू करावे अशी मागणी ज्योती पाटील यांनी केली आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

सोमवार, २० फेब्रुवारी २०२३







**स्वाभिमानी आणि अभिमानी महिला मंडळाचा हळदीकुंकू उत्साहात साजरा. अध्यक्षा राजश्री रोहिदास मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सदर हळदीकुंकू करण्यात आले. या हळदीकुंकू ला महिलांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला.**

## रोड अपघातात दुचाकीचालकाचा मृत्यू

**ठाणे:** भरधाव वेगाने भिवंडीवरून न्हावासेवा येथे निघालेल्या ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिल्याची घटना गुरुवारी दुपारी बाराच्या दरम्यान साकेत ब्रीजवर घडली. या घटनेत नाशिक येथील रहिवासी असलेला दुचाकीस्वार परविंद हरिराम मोट (२१) यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताने काही काळ त्या ब्रीजवर वाहतूक कोंडी झाली होती. मात्र अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या एका बाजूला केल्यावर तो रस्ता वाहतुकीसाठी मोकळा झाला. याप्रकरणी कळवा पोलीस ठाण्यात ट्रक चालक सुनील पटेल यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तर दुचाकीस्वार हा मुंबईला निघाला असताना हा अपघात झाला. या घटनेची माहिती मिळताच कळवा वाहतूक पोलीस धाव घेतली होती. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## दातिवली ग्रामस्थ मंडळ. आयोजित सार्वजनिक शिवजन्मोत्सव

दातिवली ग्रामस्थ मंडळामार्फत शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख रमाकांत मढवी व इतर मान्यवर उपस्थित होते



## महाशिवरात्रीदिनी लघुरुद्र अनुष्ठान

**ठाणे :** भारतीय जनता पार्टी व अध्यात्मिक समन्वय आघाडीच्या वतीने महाशिवरात्रीच्या निमित्ताने शनिवारी १८ फेब्रुवारीला होमात्मक लघुरुद्र अनुष्ठान जांभळी नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात आयोजित करण्यात आले. सकाळी ७ वाजता होमाला सुरुवात होईल. त्यात मान्यवर व्यक्तींबरोबरच शहरातील काही दांपत्ये सहभागी होत आहेत. या होमावेळी उपस्थित राहून दर्शन करावे, असे आवाहन आमदार निरंजन डावखरे यांनी केले आहे.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.


## मोफत शैक्षणिक साहित्य वाटप

**ठाणे:** महाराष्ट्र चाईल्ड डेव्हलपमेंट लेबर वेल्फेअर या संस्थेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही २३ वा मोफत शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह हॉल येथे पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे माजी महापौर मीनाक्षी शिंदे, माजी नगरसेवक सिद्धार्थ ओवळेकर यांच्या हस्ते समाजातील आदिवासी, मागासवर्गीय, भटके-विमुक्त जाती जमाती, बालमजूर, निराधार, अनाथ, दलित आणि बालसुधारगृहातील गरीब व गरजू अशा सुमारे १००० मुला-मुलींना गणवेश, नोटबुक, चपल-बूट, स्कूल बॅग, पाटी-पेन्सिल, कॅमलिन कंपास पेटी, पेन व इतर शैक्षणिक साहित्याचे मोफत वितरण करण्यात आले. ठाणे शहरातील तसेच पालघर, नवी मुंबई, रायगड, अलिबाग इत्यादी जिल्ह्यांतील अनाथ मागासवर्गीय मुला-मुलींनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

# धावत्या गाड्यांवर कोसळले झाड

**ठाणे:** धावत्या दुचाकी आणि चारचाकी वाहनासह रस्त्यालगत उभ्या केलेल्या रिक्षावर झाड कोसळल्याची घटना बुधवारी सायंकाळी आठ वाजून १०मिनिटांच्या सुमारास वागळे इस्टेट रोड नंबर १६ येथे घडली. या घटनेत अनोळखी दुचाकीस्वार जखमी झाला असून त्याला उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल केले आहे. कोसळलेले झाड हे गुलमोहराचे असून ते अंदाजे तीस वर्ष जुने आहे. या घटनेमुळे काही काळ त्या परिसरात वाहतूक कोंडी झाली होती. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

वागळे इस्टेट,रोड नंबर १६ या ठिकाणी द्वारका हॉटेल समोर असलेले गुलमोहराचे झाड रस्त्या शेजारी पार्क केलेल्या रिक्षा व श्रीनगर कडे जाणाऱ्या चारचाकी तसेच दुचाकीवर पडले. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी महापालिका उप-आयुक्त शंकर पाटोळे यांच्यासह उद्यान निरीक्षक, उद्यान तपासणीस व वृक्ष प्राधिकरण विभागाचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. घटनास्थळी पडलेले झाड आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशमन दलाने कापून बाजूला केले. पडलेल्या झाडामुळे त्या परिसरातील काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. झाड कापून बाजूला केल्यानंतर तो रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला.या घटनेत जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव समजू शकले नाही. या कोसळलेल्या झाडाने तीन वाहनांचे नुकसान झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# साबे गावातील यशोदा बाळाराम पाटील नगर परिसराचा पाणी प्रश्न सुटणार









**दिवा:–** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी नगरसेवक शैलेश मनोहर पाटिल यांना दिलेल्या निधीतून यशोदा बाळाराम पाटील नगर साबे येथे नवीन पाण्याची लाईन टाकण्यात आली. या पाईपलाईनचे उद्घाटन मा.उपमहापौर रमाकांत माढवी व मा.नगरसेवक शैलेश मनोहर पाटिल यांच्या हस्ते पार पडले.यावेळी ऍड आदेश भगत, निलेश बाळाराम पाटिल , सौ.अर्चना निलेश पाटिल ,गुरुनाथ पाटिल ,भूषण म्हात्रे व शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





**दिवा विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक शैलेश पाटील, समीर पाटील, भालचंद्र भगत, व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



# शिवजयंती निमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमार्फत चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**दिवा:–** महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना, दिवा शहर व कलावंत अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त रविवारी दि.१९ फेब्रुवारी रोजी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती . यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिवा शहर अध्यक्ष तुषार पाटील यांच्यासह स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेत दिवा शहरातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला . एस एम जी स्कूल येथे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यावेळी दिवा पोलीस चौकीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहाजी शेळके देखील उपस्थित होते.









दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, २० फेब्रुवारी २०२३


# मस्टांगला विजेतेपद

## व्हॉलीबॉल स्पर्धेच्या माध्यमातून दिवंगत मित्राला वाहिली आदरांजली




**ठाणे :** यजमान मस्टांग क्लबने गुडमॉर्निंग व्हॉलीबॉल क्लबचा सरळ दोन गेममध्ये पराभव करत दिवंगत व्हॉलीबॉलपटू धवल अहेर याला आदरांजली वाहण्यासाठी आयोजित केलेल्या दोन दिवसीय ठाणे जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

उपांत्य फेरीत सनसनाटी विजय मिळवणाऱ्या गुडमॉर्निंग व्हॉलीबॉल क्लबकडून अंतिम लढतीतही तशाच खेळाची अपेक्षा होती. पण निर्णायक लढतीत त्यांना त्याची पुनरावृत्ती करता आली नाही. पहिल्या गेममध्ये गुडमॉर्निंग व्हॉलीबॉल क्लबने चांगली लढत दिल्यामुळे मस्टांग संघाने २६ -२४ अशा नाममात्र फरकाने पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्ये मात्र मस्टांग संघाने प्रतिस्पर्ध्यांना डोके वर काढू देण्याची संधी न देता २५-११ अशा फरकाने गेम आणि सामनाही आपल्या खिशात घातला. त्याआधी उपांत्य फेरीच्या लढतीत गुडमॉर्निंग व्हॉलीबॉल क्लबने रंगतदार लढतीत टायटन्स क्लबवर २४-२६, २५-१८, १५-२६ अशी सरशी मिळवली होती. तर मस्टांग संघाने ऍचीव्हर्स संघाचा २५-२०, २५-११ असा सरळ पराभव करत अंतिम फेरीत स्थान मिळवले होते.

अव्वल दर्जाचा व्हॉलीबॉलपटू असलेल्या धवलचे ऐन उमेदीत अपघाती निधन झाले होते. त्याला श्रद्धांजली वाहण्याकरता धर्मवीर क्रीडा संकुलात खेळवण्यात आलेल्या स्पर्धेत जिल्ह्यातील आठ आघाडीच्या संघांना प्रवेश देण्यात आला होता. या स्पर्धेच्या आयोजनाचा सर्व आर्थिक भार त्याच्या मित्रांनी उचलला होता. विशेष म्हणजे ठाणे जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेच्या पंचांनीही दोन दिवस विनामूल्य आपली सेवा दिली. या स्पर्धेच्या निमित्ताने चांगल्या स्थितीतील जुने कपडे दान करण्याचे आवाहन धवलच्या मित्रांनी केले होते. त्यालाही नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

# महात्मा गांधी उद्यानालगत भेळविक्रेत्यांच्या पुनर्वसनाचा घाट

**ठाणे:** तलावपाळीलगत व्यवसाय करणाऱ्या भेळविक्रेत्यांचे महात्मा गांधी उद्यानालगत पुनर्वसन करण्याचा घाट महापालिकेने घातला आहे. खाऊ गल्लीच्या नावावर होणाऱ्या या पुनर्वसनाला स्थानिक इमारतींमधील रहिवाशांकडून तीव्र विरोध दर्शविला आहे. वेळप्रसंगी रहिवाशांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

## स्थानिक रहिवाशांचा तीव्र विरोध

तलावपाळीलगत मोठ्या संख्येने भेळ विक्रेते हातगाड्यांवर व्यवसाय करीत होते. या विक्रेत्यांकडून खरकटे व कचरा तलावात टाकल्या जात असल्याच्या सातत्याने तक्रारी होत्या. त्याचबरोबर या ठिकाणी कचराही साचून दुर्गंधी पसरत होती. या पार्श्वभूमीवर आयुक्त अभिजीत बांगर यांच्या आदेशानंतर भेळविक्रेत्यांना हटविण्यात आले होते. तलावपाळीच्या परिसराने मोकळा श्वास घेतला होता. तसेच हटविलेल्या भेळविक्रेत्यांचे पुनर्वसन करण्याचा घाट घालण्यात आला आहे. तलावपाळीलगतच्या महात्मा गांधी उद्यानात भेळविक्रेत्यांचे पुनर्वसन करण्याबाबत चाचपणी करण्यात आली. त्यानुसार या ठिकाणी नुकतीच आयुक्त अभिजीत बांगर यांनी भेट देऊन पाहणी केली. त्यामुळे रहिवाशांमध्ये नाराजी आहे.

या परिसराची शांतता भेळविक्रेत्यांमुळे धोक्यात येणार आहे. त्याचबरोबर या ठिकाणी विक्रेते व नागरिकांचा रात्री उशीरापर्यंत वावर असल्यामुळे रहिवाशांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. या ठिकाणी केसरवाडी ट्रस्ट, कर्णबधीर विद्यालय आहे. त्यांनाही फेरीवाल्यांचा फटका बसण्याची भीती आहे. या प्रस्तावाला राज हॉल, मोती बाजार बिल्डिंग, रुक्मिणी वामन बिल्डिंग, ब्राह्मण सभा, गुरु छाया बिल्डिंग, भरत भवन बिल्डिंग येथील रहिवाशांचा विरोध आहे. त्यांनी महापालिका आयुक्त अभिजित बांगर, माजी महापौर नरेश म्हस्के, भाजपाचे माजी ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले यांना निवेदन दिले आहे.

# कल्याण-तळोजा मेट्रोमार्ग स्थानकांच्या उभारणीसाठी १५२१ कोटींची निविदा जाहीर




## मेट्रो-१२ मार्गाचे बांधकाम सुरू होणार, एमएमआरडीएकडून निविदा जाहीर

**ठाणे:** कल्याण-तळोजा उन्नत मेट्रोच्या (मेट्रो-१२) उभारणीला लवकरच सुरूवात होणार असून प्रत्यक्ष मार्गिकाउभारणी आणि मार्गातील १७ उन्नत स्थानकांच्या बांधकामासाठी एमएमआरडीएकडून १ हजार ५२१ कोटींची निविदाजाहीर करण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतेच कल्याण येथील एका लोकार्पणकार्यक्रमात कल्याण-तळोजा मेट्रो मार्गाला लवकरच गती प्राप्त होणार असल्याचे सांगितले होते. यानंतर अवघ्या दोन दिवसांच्या कालावधीतच या मेट्रो मार्गिका आणि मार्गातील १७ स्थानकांच्या प्रत्यक्ष उभारणीच्या कामाच्या १ हजार५२१ कोटी इतक्या कोटींच्या निविदा जाहीर करण्यात आल्या आहेत. येत्या ३० महिन्यात हे काम पूर्ण केले जाणार असून लवकरच मेट्रो १२ प्रवाशांच्या सेवेत येणार आहे. लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे या प्रकल्पाचासातत्याने पाठपुरावा करत असून हा मार्ग आता दृष्टीपथात आहे.

ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रोचे विस्तारित रूप म्हणून कल्याण -तळोजा मेट्रो मार्गाकडे पहिले जाते. या मार्गाच्याउभारणीसाठी कल्याण लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. शिंदे यांनी सतत पाठपुरावा केला. अखेर यामार्गाच्या आणि यातील स्थानकांच्या प्रत्यक्ष बांधकामांच्या निविदा एमएमआरडीए प्रशासनाने जाहीर केल्याने त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्यामाध्यमातून उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पामुळे ठाणे पल्याड राहणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबईसह ठाणे आणि ठाणेपल्याड कल्याण-डोंबिवली या शहरांसाठीही मेट्रो मार्गाची उभारणी केली जाते आहे. याअंतर्गत ठाणे - भिवंडी - कल्याण या मेट्रो मार्गाची उभारणी वेगाने सुरू आहे. हा मार्ग पुढे कल्याणपासून डोंबिवली आणिकल्याण तालुक्यातील काही गावे तसेच पुढे तळोजापर्यंत जाणार आहे. एकूण २० किलोमीटर लांबीचा हा मार्ग असूनयात १७ स्थानके आहेत.

### *या स्थानकांच्या समावेश*

*कल्याण तळोजा (मेट्रो १२) अंतर्गत गणेश नगर, पिसावली गाव, गोलवली, डोंबिवली एमआयडीसी, सागाव, सोनारपाडा, मानपाडा, हेदुटणे आणि कोळेगाव, निळजे गाव, वडवली(खुर्द), बाळे, वाकलन, तुर्भे, पिसार्वे डेपो, पिसार्वे आणि तळोजाया स्थानकांचा समावेश आहे.*


***कल्याण तळोजा मेट्रो मार्गिका आणि स्थानकांच्या प्रत्यक्ष बांधकामांच्या निविदा जाहीर झाल्या असून या प्रकल्पाचीपायाभरणी लवकरच होणार आहे. या प्रकल्पामुळे नागरिकांना एक मोठा दिलासा मिळणार आहे. तर निश्चितकालावधीच्या आधीच या मार्ग पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असणार आहोत.***

***- डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार***

या मार्गाच्या उभारणीमुळे कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्र, कल्याण तालुक्यातील ग्रामीणभाग थेट नवी मुंबई, तळोजा या भागांशी जोडला जाणार आहे. या उन्नत मेट्रोची प्रत्यक्ष मार्गिका उभारणी आणिस्थानकांच्या बांधकामांची १ हजार ५२१.८ कोटी रुपयांच्या निविदा जाहीर करण्यात आल्या. यामुळे लवकरच यामार्गाच्या प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होणार आहे. तर येत्या अडीच वर्षाच्या कालावधीत या मार्गाचे बांधकाम पूर्णहोणार आहे. या मार्गाला गती मिळावी यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे सातत्याने बैठका घेत पत्रव्यवहार करत होते. त्यानंतर या मार्गाचे सर्वे क्षण करून त्यासाठीच्या सखोल आरेखन सल्लागार नेमणुकीसाठीच्या निविदा नुकत्याच जाहीर केल्या होत्या.



# महापालिका भवनातील व ठामपा शाळांमधील स्वच्छतागृहे सर्व सुविधांनी अद्ययावत करावीत –आयुक्त अभिजीत बांगर



## महापालिका भवनातील तळमजल्यावरील स्वच्छतागृह अद्ययावत पध्दतीने नुतनीकरण

**ठाणे : शहरातील सार्वजनिक शौचालयांबरोबरच महापालिकेच्या इमारतीतील शौचालये ही चांगल्या दर्जाची, नियमित स्वच्छ असणे आवश्यकच आहे. महापालिकेत नागरिक विविध कामांसाठी येत असतात व ते शौचालयाचाही वापर करतात, महापालिकेतील शौचालये जर अस्वच्छ असतील तर मग सार्वजनिक शौचालयांची काय अवस्था असेल असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडल्यावाचून राहत नाही. यासाठी सार्वजनिक शौचालयांच्या स्वच्छतेबरोबरच सर्व प्रथम महापालिका इमारतीतील सर्व शौचालये स्वच्छ व चांगल्या दर्जाची असावीत असे निर्देश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी ठाणे महानगरपालिकेच्या आयुक्तपदाची सुत्रे हातात घेतल्यानंतर संबंधित विभागांना दिले होते. त्यानुसार महापालिका भवनातील तळमजल्यावरील सर्व सुविधांसह शौचालयाचे नुतनीकरण करण्यात आले असून या कामाबाबत आयुक्तांनी समाधान व्यक्त केले .**

दोन महिन्यांपूर्वी महापालिका मुख्यालयाच्या चारही मजल्यावरील शौचालयांची पाहणी केल्यानंतर चांगल्या दर्जाच्या फरश्या, दैनंदिन साफसफाई, दुर्गंधीमुक्त, पूर्णवेळ देखरेख करणारा कर्मचारी नेमावा आदी बदल करणेबाबत सूचना आयुक्तांनी दिल्या होत्या, त्यानुसार घनकचरा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी महापालिकेच्या इमारतीतील शौचालयांच्या दुरूस्तीचे काम हाती घेवून अद्ययावत सुविधांसह तळमजल्यावरील शौचालयाचे नुतनीकरण केले.

आयुक्त बांगर यांनी मंगळवारी महापालिकेच्या तळमजल्यावरील नुतनीकृत शौचालयाची पाहणी केली. त्यावेळी, नगर अभियंता प्रशांत सोनग्रा, उपायुक्त तुषार पवार उपस्थित होते. याच धर्तीवर महापालिकेच्या सर्व शाळांमधील शौचालयांचे नुतनीकरण करण्याबाबत नियोजन करण्याचे निर्देश आयुक्त बांगर यांनी दिले. तळमजल्यावर असलेले सर्वाधिक वापरले जाणारे हे शौचालय आहे. त्याचे काम चांगले झाले असून ते नियमित दुर्गंधीमुक्त शौचालय राखणे ही जबाबदारी देखभाल करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आहे. त्यात कोणतीही तडजोड नको असेही त्यांनी यावेळी नमूद केले.शहरातील सार्वजनिक शौचालयांची अवस्था सुधारण्याचा आग्रह आपण धरतो. त्याचबरोबर आपला वावर असलेल्या कार्यालयातील शौचालयांची स्थिती चांगलीच असली पाहिजे व ती नियमित राहील याबाबत दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. या शौचालयाच्या धर्तीवर पालिकेतील सर्व शौचालय सुधारण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच, महिलांच्या प्रसाधनगृहांचीही याच पद्धतीने सुधारणा केली जावी, असे आयुक्त बांगर म्हणाले.

शहरात पाहणी करताना बहुतांश स्वच्छतागृहे अस्वच्छ तसेच अनेक ठिकाणी देखभाल दुरुस्ती करणारा कर्मचारी नसल्याचे दिसून आले. तसेच, पाणी गळती आणि अस्वच्छता यामुळे या स्वच्छतागृहांची स्थिती बिकट असल्याचे आयुक्त बांगर यांच्या निर्दशनास आले. याबाबत तातडीने कार्यवाही करुन सार्वजनिक शौचालय हे आपल्या घरातील व्यक्ती वापरणार आहे, असे समजून स्वच्छतागृहे स्वच्छ राहतील या दृष्टीने काम करण्याचे आदेश त्यांनी दिले. तसेच दिव्यांग व्यक्ती कामानिमित्त महापालिकेत येत असतात, त्यांच्यासाठी सुयोग्य असे प्रसाधनगृह महापालिका मुख्यालयात नाही. त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याचे आदेश आयुक्त बांगर यांनी बांधकाम विभागाला दिले.

# दिघा रेल्वे स्थानकातून महिन्या अखेरपर्यंत धावणार लोकल !

## स्थानकातील ९५ टक्के काम मार्गी



### खासदारांनी केला रेल्वे अधिकाऱ्यांसोबत पाहणी दौरा

**ठाणे:** ऐरोली-कळवा एलिवेटेड या महत्वकांक्षी प्रकल्पमधील दिघा रेल्वे स्थानकाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे मार्गी लावत येत्या महिन्या अखेर पर्यंत ती कामे पूर्ण होतील आणि या स्थानकातून निश्चित लोकल धावले. असा विश्वास ठाणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार राजन विचारे यांनी सोमवारी केलेल्या पाहणी दौऱ्यानंतर व्यक्त केला आहे. यामुळे ठाणे रेल्वे स्थानकातील प्रवाशांचा वाढणारा अतिरिक्त भार ही कमी होणार आहे . त्यामुळे ठाण्यातील प्रवाशांना दिलासा मिळेल. असेही ते म्हणाले.

या पाहणी दौऱ्यात दिघा रेल्वे स्थानकाचे काम ९५ टक्के पूर्ण झालेले आहे. त्यामुळे या स्थानकातून महिन्या अखेर पर्यंत लोकल धावेल अशी माहिती खासदार विचारे यांनी दिली. यावेळी एमआरव्हीसीचे मुख्य प्रकल्प अधिकारी बी के जहा, उपप्रकल्प अधिकारी चौधरी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळचे सर्व्हे अधिकारी खैरे, नवी मुंबई महापालिकचे कार्यकारी अभियंता सोनावणे, वाहतूक शाखेचे सह पोलीस आयुक्त गायकवाड, जिल्हाप्रमुख विठ्ठल मोरे, व्दारकानाथ भोईर, उपजिल्हा प्रमुख मनोज हळदणकर आदी उपस्थित होते.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे फायदे

नवी मुंबई शहरात नोकरीनिमित्त कल्याण, डोंबिवली ,अंबरनाथ, बदलापूर येथील नागरिक येत असतात, या रेल्वे प्रवाशांना नवी मुंबईत येण्यासाठी ठाणे रेल्वे स्थानकात येऊन हार्बर मार्गावरील वाशी लोकल पकडावी लागते, त्यामुळे या प्रवाशांचा वेळ ताकद खर्ची पडत असते या प्रवाशांना डायरेक्ट नवी मुंबईमध्ये प्रवेश मिळण्यासाठी हा ऐरोली कळवा एलिव्हेटेड प्रकल्प महत्त्वाच ठरणार आहे, तसेच यामुळे ठाणे रेल्वे स्थानकातील प्रवाशांचा वाढणारा अतिरिक्त भार ही कमी होणार आहे, त्यामुळे ठाण्यातील प्रवाशांना दिलासा मिळेल.

**दिघा रेल्वे स्थानकात**

फलाट १/२ व ३/४. फलाटाची लांबी २७० व रुंदी १२ मीटर, भुयारी मार्ग ५, सरकते जिने ६, लिफ्ट २, दोन्ही बाजूस पार्किंग व्यवस्था ४००+४००, दोन्ही बाजूस G+२ इमारत असून त्यामध्ये ६+६ तिकीट खिडकी व कार्यालय, शौचालय २, पाण्याची सोय (२ वॉटर कुलर फलाट) १/२ व ३/४

# महिला बचतगटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'सोनचिरैया सुपर मार्केट' महत्वाची भूमिका बजाविणार

**रत्नागिरी :** महिला बचतगटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सोनचिरैया सुपर मार्केटची भूमिका अत्यंत महत्वाची आहे,असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

केंद्र शासन पुरस्कृत 'दीनदयाळ अंत्योदय योजना' राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत व रत्नागिरी नगर परिषदेच्या माध्यमातून येथील स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृह इमारतीमध्ये तयार करण्यात आलेल्या राज्यातील पहिल्या 'सोनचिरैया सुपर मार्केट'चे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सोनचिरैया सुपर मार्केटची पाहणी करुन या मार्केटमधील उत्पादनांची माहिती घेतली. या सुपर मार्केटमधील सर्व उत्पादने ही महिला बचतगटांनी तयार केलेली आहेत. त्यामुळे या उत्पादनांचा दर्जा निश्चितच उत्तम असेल, असा विश्वास यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला.

रत्नागिरीमध्ये सुरु करण्यात आलेल्या सुपर मार्केटप्रमाणे राज्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये बचतगटांसाठी सुपर मार्केट तयार करण्यासाठी शासनस्तरावर निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

उद्योगमंत्री श्री. उदय सामंत म्हणाले, जिल्ह्यातील १६० बचतगटांनी एकत्र येवून हे मार्केट उभारले आहे. महिला बचतगटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी याकरीता सोनचिरैया सुपर मार्केट उभारण्यात आले असून राज्यातील पहिले बचतगटांचे सुपरमार्केट रत्नागिरी जिल्ह्यात सुरु करण्यात आल्याबद्दल पालकमंत्र्यांनी अभिमान व्यक्त केला. रत्नागिरीमध्ये उभारण्यात आलेल्या या सुपर मार्केटप्रमाणेच जिल्ह्यातील अन्य तालुक्यांमध्येही बचत गटांसाठी विक्री केंद्र उभारण्यात येणार असून त्याकरिता जिल्हा वार्षिक योजनेतून साडेसात कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री श्री. सामंत यांनी यावेळी दिली. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ रत्नागिरी विभागातंर्गत नवीन बसचे लोकार्पण आज स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृह येथे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

रत्नागिरी जिल्ह्याकरीता ५० नवीन बस उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. यावेळी मुख्यमंत्री नवीन बसमधून स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृह ते शासकीय विश्रामगृह या मार्गाने प्रवासही केला.

यावेळी राज्याचे उद्योगमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, आमदार योगेश कदम, परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने, जिल्हाधिकारी एम.देवेंद्र सिंह, आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय किरण कुलकर्णी, पोलिस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, उपमहाव्यवस्थापक श्रीनिवास जोशी, रत्नागिरी नगर परिषदेचे मुख्याधिकारी तुषार बाबर विभाग नियंत्रक प्रज्ञेश बोरसे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिक्षकांची ३० हजार पदे लवकरच भरणार –मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

सिंधुदुर्गनगरी दि.१६ :- शिक्षकांच्या जुन्या निवृत्ती वेतन योजनेबाबत कायदेशीर, आर्थिक बाबी तपासून सकारात्मक मध्यमार्ग काढू तसेच शिक्षकांची सुमारे ३० हजार पदे लवकर भरली जातील, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

वेंगुर्ला येथे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या १७ व्या त्रैवार्षिक राज्य महाअधिवेशनाचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती राज्याध्यक्ष उदय शिंदे, माजी आमदार राजन तेली, निवृत्त ब्रिगेडियर सुधीर सावंत, जिल्हाधिकारी के. मंजुलक्ष्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रजित नायर, पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, माजी राज्याध्यक्ष काळुजी बोरसे पाटील आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, शिक्षक हे भावी पिढीला आकार देण्याचं, संस्कारित करण्याचं अतिशय मोलाचं काम करत असतात. शिक्षकांचे समाजामध्ये मोलाचे योगदान आहे. समाज घडविण्याचे काम शिक्षक करतात. शिक्षकांवर जास्त बंधने लादली जाणार नाहीत. शासनाने गेल्या सहा-सात महिन्यांमध्ये शेतकरी, शिक्षक, कष्टकरी, कामगार तसेच विद्यार्थी या सर्वांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. जे निर्णय शासनाने घेतले आहेत ते निर्णय हे राज्याचे हित लक्षात घेऊनच घेतले आहेत. सर्व सामान्य घटक वंचित राहू नये, असे केंद्रबिंदू मानून निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यातील घटकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, मुख्य प्रवाहात आणण्यासाठी निर्णय घेतले आहेत.

मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले, चंद्रपूरमधील पालडोह मधील शाळा ३६५ दिवस सुरु आहे. तोरणमाळ येथील शाळेला आदर्श निवासी शाळा पारितोषीक मिळाले आहे. शिक्षकांचे यासाठी समर्पण महत्वाचे आहे. ६१ हजार शिक्षकांसाठी ११ कोटी रुपये देण्याचा निर्णय तत्काळ घेतला. शिक्षकांच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य दिले जाईल. शिक्षक हे ज्ञानदानाचे काम करत असतो. शिक्षणाचा दर्जा आणि विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे.

राष्ट्रीय स्तरावरील शिक्षण सर्वेक्षणामध्ये शिक्षकांनी मोठी झेप घेतली आहे. यात सरकारी शाळांचा वाटा खूप मोठा आहे. पालक व समाजाचा सरकारी शाळेवरील विश्वास देखील आता वाढत चालला आहे. सरकारी शाळेतील विद्यार्थी कुठल्याही क्षेत्रात कमी नाही. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या कार्यमान प्रतवारी कामगिरी निर्देशांकात एकूण १००० गुणांपैकी महाराष्ट्राला ९२८ गुण मिळाले आहेत. त्यामुळे आपल्या महाराष्ट्राचा देशात पहिला क्रमांक आला आहे. यामध्ये शिक्षकांचे मोठे योगदान आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

## मुंब्रा, कोपर व भिवंडी खाडीत अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा

# सक्शन पंप व बार्ज यांचे इंजिन केले नष्ट



**ठाणे:** मुंब्रा खाडी, कोपर खाडी व भिवंडी लगतच्या खाडीमध्ये गस्तीवर असलेल्या ठाणे व भिवंडी तहसील कार्यालयाच्या पथकाने सोमवारी अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्या २ सक्शन पंप आणि २ बार्जवर धडक कारवाई केली. तसेच त्या सक्शन पंप व बार्ज यांच्या इंजिनमध्ये साखर टाकून नष्ट करून पाण्यामध्ये बुडविण्यात आले. तसेच खाडी लगत असलेल्या रेती साठ्यासह ३ कुंड्या नष्ट करण्याची कारवाई केली. या कारवाईमध्ये अंदाजे ५० लाखांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

जानेवारी व फेब्रुवारीमध्ये अनधिकृत रेती उत्खननावर ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत धडक कारवाई करण्यात येत असून मागील तीन आठवड्यामध्ये आठ कारवाया केल्या आहेत. या कारवायांमध्ये ९ बार्ज, ७ सक्शन पंप, २० ब्रास रेतीसाठा, ९ रेतीच्या कुंड्या (हौद) नष्ट करण्यात आले. त्या साहित्याची एकूण किंमत एक कोटी ७२ लाख रुपये आहे. आजही मुंब्रा, कोपर व भिवंडी खाडीलगत कारवाई करून अवैध रेती उत्खनन करणाऱ्या सक्शन पंप व बार्जवर कारवाई करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयाने ०१ एप्रिल २०२२ ते १३ फेब्रुवारी २०२३ पर्यंत जिल्ह्यांतर्गत अनधिकृत गौण खनिज वाहनांच्या तपासणी मोहिमेदरम्यान ११ हजार ३०७ वाहनांची तपासणी केली असून आजपर्यंत आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये एकूण २०५ वाहनांवर दंडात्मक कारवाई केली आहे. अनधिकृत गौण खनिज वाहन करणाऱ्या ट्रक मालकांकडून ३०१ कोटी ६१ लाख एवढा महसूल वसूल करण्यात आलेला आहे. अनधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहन याच्यावर देखरेख ठेवण्याकरिता अद्ययावत महाखनिज प्रणालीचा वापर करण्यात येत असून त्याद्वारे छाननी करून अनधिकृत वाहनांवर कारवाई करण्यात येत असल्याचे जिल्हा प्रशासनामार्फत सांगण्यात आले आहे.

# रस्त्यांच्या दुतर्फा उभ्या असलेल्या भंगार गाड्यांवर नियमित कारवाई आवश्यक – आयुक्त अभिजीत बांगर




## श्रीनगर परिसरातील भंगार गाड्यांवर महापालिकेची कारवाई

**ठाणे: रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत होण्याकरिता रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या जागा मोकळ्या असणे गरजेचे आहे. शहरात अनेक ठिकाणी रस्त्यांवर भंगार अवस्थेतील गाड्या उभ्या केलेल्या असल्यामुळे याचा त्रास नागरिकांना व वाहतूकीस होवून परिसरात वाहतूक कोंडी होत असते. यासाठी रस्त्याच्या कडेला भंगार अवस्थेतील गाड्या नजरेस पडल्या तर त्या तात्काळ उचलण्याची कारवाई करण्यात यावी असे निर्देश् महापालिका आयुक्तांनी संबंधितांना दिले आहेत.**

नुकत्याच मुलुंड चेकनाका, श्रीनगर रस्त्यांवरील १४ भंगार गाड्या उचलण्याची कारवाई केल्याने त्या परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला असून येथील वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली आहे.

श्रीनगर पोलीस चौकी येथील रस्त्यांवर अनेक महिन्यांपासून भंगार अवस्थेतील चारचाकी व दुचाकी गाड्या उभ्या केलेल्या असल्याच्या तक्रारी आयुक्त बांगर यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. या गाड्यांमुळे परिसरातील वाहतूकीस अडथळा निर्माण होत होता तसेच नागरिकांना देखील येथून जाणे व परिसराची स्वच्छता करणे त्रासाचे होत होते. आयुक्त बांगर यांच्या आदेशानुसार परिमंडळ २ चे उपायुक्त शंकर पाटोळे यांच्या उपस्थितीत सहाय्यक आयुक्त व स्थानिक पोलीसांच्या मदतीने त्या भंगार गाड्या उचलण्याची कारवाई करण्यात आली. यात ४ चार चाकी गाड्या व दहा दुचाकी उचलल्यामुळे या ठिकाणच्या रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी सुटण्यास मदत झाली आहे. तसेच या ठिकाणी असलेल्या शौचालयांची नव्याने पुर्नबांधणी केली जाणार असून श्रीनगर पोलीस चौकी परिसरही सुशोभित केला जाणार असल्याचे उपायुक्त शंकर पाटोळे यांनी नमूद केले.

भंगार अवस्थेतील कारवाई करण्यात आलेली वाहने बाटा कंपाऊंड येथे जमा करण्यात आली आहेत. यापुढे शहरात कुठेही भंगार अवस्थेतील गाड्या रस्त्यांच्या दुतर्फा अनेक दिवसांपासून उभ्या असतील त्या तातडीने हटवून नागरिकांना परिसर मोकळा करुन द्यावा अशा सूचना आयुक्त बांगर यांनी संबंधित उपायुक्त व सहाय्यक आयुक्तांना दिल्या आहेत.

### या क्रमांकावर संपर्क करा

संपूर्ण शहरात वेळोवेळी ही कारवाई सुरू रहावी याबाबतचे आदेश महापालिका आयुक्तांनी तिन्ही परिमंडळ उपायुक्तांना दिले आहेत. तसेच नागरिकांनीही याबाबत काही तक्रारी असतील तर आपत्कालीन विभागाशी ८६५७८८७१०१ / ८६५७८८७१०२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# दोन्ही बाजूचे सर्व्हिस रोड होणार मुख्य घोडबंदर रोडमध्ये समाविष्ट



## वाहतुक कोंडी सुटेल – आमदार प्रताप सरनाईक यांचा दावा

**ठाणे :** वाहतुक कोंडी हा जटील प्रश्न होऊन बसला आहे. तीच कोंडी फोडण्यासाठी घोडबंदर रोड परिसरातील कापुरबावडी ते गायमुखपर्यंत असलेले दोन्ही बाजूचे ९-९ मीटरचे सर्व्हिस रोड आता मुख्य घोडबंदर रोड समाविष्ट केले जाणार आहेत. त्यामुळे येथील वाहतुक कोंडी सुटण्यास मोठ्या प्रमाणात मदतच होईल असा दावा ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रताप सरनाईक यांनी केली. मंगळवारी त्यांनी ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या दालनात या संदर्भात एक बैठक बोलावली होती. याचदरम्यान त्यांनी घोडबंदर भागातील वाहतुक कोंडीसह इतर महत्वाच्या विषयांवर चर्चा केली. याशिवाय त्यांनी घोडबंदर भागातील वाहतुक कोंडी सुटावी, यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सर्व्हिस रोड हे मुख्य रस्त्यात समाविष्ट करण्याबाबत पत्र व्यवहार करण्यात आल्याचे ही सांगितले. त्यानुसार महापालिकेला देखील तसे अवगत करुन देण्यात आल्याची माहिती त्यांनी या बैठकीत दिली. त्यानुसार याची कार्यवाही सुरु असल्याची माहिती महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली. तर, सरणाईकांनी कापूरबावडीपासून गायमुखपर्यंत सर्वेक्षण केले असता,त्यांच्या असे निर्दशनास आले की, घोडबंदर रोडवर १ बीएचके मध्ये राहणाऱ्या नागरिकांकडे सुद्धा चारचाकी वाहने असून मोठ्या प्रमाणात पार्किंगची समस्या असल्यामुळे महापालिकेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या ९ मीटर सर्व्हिस रोडचा वापर रस्त्याजवळील दुकानदार व काही खाजगी गाड्या तसेच टेम्पो, ट्रक, ऑटो रिक्षा पार्किंगसाठी केला जातो, त्यामुळे तेथे पार्किंग प्लाझा उभारणे गरजेचे आहे. तसेच सर्व्हिस रोडवर असलेल्या पार्किंगमुळे वाहनचालक सर्व्हिस रोडचा वापर न करता मुख्य रस्त्याचाच वापर करीत असून सर्व्हिस रोडच्या बाजूला असलेल्या गटारावरील ५ ते ६ फुट असलेल्या फुटपाथचा वापर पादचाऱ्यांना होत नसल्याचे निर्दशनास येत आहे.



# मुंब्रा कळवा विधानसभा मतदासंघातील २९ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन

**ठाणे** – कल्याण लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते रविवारी मुंब्रा कळवा विधानसभा मतदारसंघातील एकूण २९ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन पार पडले. यामध्ये मुंब्रा, कळवा, खारीगाव या भागातील रस्ते काँक्रीटीकरण, जलवाहिनी टाकणे, शौचालयांची उभारणी, विसर्जन घाट, अभ्यासिका या विकासकामांचा भूमिपुजन करण्यात आले. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या खासदार विशेष निधीतून ही विकासकामे मार्गी लागणार आहे. तसेच यावेळी डोंबिवली येथे वातानुकूलित अभ्यासिकेचे आणि वाचनालयाचे लोकार्पण करण्यात आले.

## खासदार डॉ.शिंदे यांच्या पाठपुराव्यातून मतदारसंघात भरीव निधी

खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे संपूर्ण मतदारसंघात विविध विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत असल्याने अनेक विकासकामे मार्गी लागत आहे. यामध्ये कल्याण डोंबिवली शहरात महानगरगॅसची पाईपलाईन टाकणे, जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागात पाण्याची सुविधा उपलब्ध करणे, अंबरनाथ येथील मंदिर परिसराचा विकास करणे यांसारखे अनेक विकास कामे खासदार शिंदे यांच्या पुढाकाराने सुरू आहेत. याबरोबरच आता कल्याण लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या मुंब्रा कळवा येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले आहे. यामध्ये ठाणे कळवा येथील उड्डाणपुलाचे मास्टिक पद्धतीने डांबरीकरण करणे यासाठी ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच खारीगाव परिसरातील विविध रस्त्यांचे ५ कोटी रुपयांचे निधीतून काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. तर पारसिक नगर येथील दशक्रिया विधी जेट्टी दुरुस्ती करणे, खुला रंगमंच उभारणे आणि जलवाहिनी टाकणे या कामांसाठी ३.४३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून या कामांचेही यावेळी भूमिपूजन करण्यात आले.

# इच्छतेश्वर शिवशक्ती मंदिरात महाशिवरात्री उत्सव साजरा



दिवा स्टेशन येथील इच्छतेश्वर शिवशक्ती मंदिरात महाशिवरात्रीचा उत्सव उत्साहात संपन्न झाला. महाशिवरात्रीनिमित्त दिव्यातील अनेक भक्तांनी या मंदिरात जाऊन भगवान शंकराचे दर्शन घेतले. एक जागृत देवस्थान अशी या मंदिराची ओळख आहे. दिव्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ब्रह्मा शेठ पाटील ,माजी नगरसेवक अमर पाटील यांच्या माध्यमातून दरवर्षी इच्छतेश्वर शिवशक्ती मंदिरात महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न होतो.











दरवर्षी प्रमाणे यंदाही श्रीकृपा नगर येथे नगरसेवक़ शैलेश मनोहर पाटिल यांच्यातर्फे महिलांसाठी भव्य  हळदी कुंकू समारंभ आयोजित केला होता.या कार्यक्रमाला महिलांची मोठया प्रमाणात गर्दी होती.यावेळी शैलेश पाटील यांचे समर्थक व कार्यकर्ते देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.





